जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ८ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने पी. एम. उषा कार्यक्रमांतर्गत 'साहित्यातील मानवतावाद' या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. ९ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यकार डॉ. जयप्रकाश कर्दम (माजी संचालक, केंद्रीय हिंदी प्रशिक्षण संस्था, गृह मंत्रालय, भारत सरकार) यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव यांचे बीजभाषण तर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहतील यावेळी भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे उपस्थित राहतील.

या चर्चासत्रात गोवा विद्यापीठाच्या मराठी अध्यन शाखेचे संचालक डॉ. विनय मडगांवकर, छत्रपती संभाजीनगर येथील युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. राहुल कोसंबी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील  भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक अभ्यास शाळाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठावाडा विद्यापीठाचे माजी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. काशिनाथ रणवीर, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन.भालेराव यांची व्याख्याने होणार आहेत.  या चर्चासत्रात मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये स्वतंत्र संशोधन पेपर वाचन सत्रांचे आयोजन करण्यात आले. विविध विद्यापीठांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी साहित्यामधील मानवतावाद, मानवी मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि समकालीन साहित्य यावर आपले विचार मांडणार आहेत.

समारोप : या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप जळगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या वासंती दिघे, जळगाव,  विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे, व्यस्थापन परिषद सदस्य  राजेंद्र नन्नवरे, सहसंचालक, उच्चशिक्षण डॉ. पराग मसराम उपस्थित राहणार आहेत अशी माहिती चर्चासत्राचे समन्वयक डॉ.सुदर्शन भवरे यांनी दिली.

## बातमी क्र.२

जळगाव, (दि.०८) प्रतिनिधी -  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्था व्दारा आयोजित द्विदिवसीय "Advances in Chemical Technology and Allied Sciences" (रसायन अभियांत्रिकी व संलग्न विज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा व ज्ञानविनिमय) या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचा दि.७ रोजी सांयकाळी समारोप झाला.

यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणुन जी पी टेक सेफ्टी मर्यादितचे संचालक गजेंद्र पाटील, विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व निर्धारण कक्षाचे संचालक प्रा.समीर नारखेडे, पी.एम.उषा समन्वयक प्रा. एस.आर. कोल्हे, संचालक ए के गोस्वामी, अधिसभा सदस्य व सहसमन्वयक प्रा. विशाल पराते, सहसमन्वयक आर.जे.शिरसाम उपस्थित होते.

यावेळी गजेंद्र पाटील यांनी आजच्या ए आय मुळे  उद्योगांतील कामात सहजता, सुरक्षितता आली असून कार्यक्षमतेतवाढ झाली आहे.  तसेच आर्थिकदृष्टया एआय तंत्रज्ञान परवडणारे आहे. गुणवत्तेतवाढ झालेली आहे. असे असले तरी मानवी बुध्दीला पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.समीर नारखेडे यांनी या आंतरराष्ट्रीय परीषदेतून मिळालेले संशोधन विषयीचे ज्ञान व माहितीचा वापर करुन केमीकल इंजिनीयअरींगच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करावे असे सांगितले. यावेळी संचालक ए.के.गोस्वामी यांनी मनोगत व्यक्त केले तर प्रा.शिरसाम यांनी दोन दिवसीय परीषदेतील आढावा सादर केला. या परिषदेत देशभरातील नामांकित शैक्षणिक व संशोधन संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर संशोधन निबंध प्राप्त झाले, ज्यातून या विषयाचा व्यापक राष्ट्रीय प्रभाव स्पष्ट झाला.

परीक्षणानंतर ५६ संशोधन निबंधांची तोंडी सादरीकरणासाठी निवड करण्यात आली, तर १२५ संशोधन निबंध पोस्टर स्वरूपात सादर करण्यात आले. यासोबतच देश-विदेशातील तज्ज्ञांनी १७ आमंत्रित व्याख्याने सादर करून परिषदेच्या तांत्रिक दर्जात आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनात भर घातल्याची माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. शिरसाम यांनी दिली. सहभागी तीन विद्यार्थ्यांनी त्यांची मते व्यक्त केली. आभार प्रा. विशाल पराते यांनी मानले.

या कार्यक्रमात उत्कृष्ठ सादरीकरण केलेल्या अंकित पाटील, विनोद पालखे, विलास जगताप, राणी गुप्ता, हर्शल पाटील यांना तर उत्कृष्ठ पोस्टर सादरीकरण प्रझेंटेशन बाबत सारिका पवार,तेजस भोई, उमझा नाझ शेख इक्बाल, रुपाली शिंपी, निलेश बेलसारे, प्रिती बोबाडे, चंद्रशेखर पाटील, शिवराज ढोले, भुषण बारी, श्रुतिका टोंगसे, भक्ती देशमुख यांना स्मृती चिन्ह देण्यात आले.

या दोन दिवसांचे तांत्रिक सत्र अत्यंत सुबक आणि नियोजनबद्ध स्वरूपाचे होते. परिषदेत समांतर तोंडी सादरीकरण सत्रे, पोस्टर सादरीकरणे, पॅनल चर्चा तसेच परस्परसंवादी तांत्रिक सत्रांचा समावेश होता. यामुळे संशोधक, प्राध्यापक, उद्योग प्रतिनिधी व विद्यार्थ्यांना सखोल शैक्षणिक संवादाची संधी मिळाली.

## बातमी क्र.३

जळगांव दि . ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्रे प्रशाळातर्फे पीएम उषा अंतर्गत दिनांक २३ व २४ जानेवारी रोजी " मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता" (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी गुरुवारी आढावा घेतला.

विद्यापीठात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी आतापर्यंत ३१९ संशोधन पेपर प्राप्त झाले आहेत. यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील २२ पेपर महाराष्ट्र बाहेरील५६ पेपर तर महाराष्ट्रातून २४१ असे ३१९ संशोधन लेख प्राप्त झाले आहे. यातील निवडक २२० संशोधन लेखांचे सादरीकरण होणार असून सर्वोत्कृष्ट सादरीकरण आणि संशोधन पेपर्सला पारितोषिक देण्यात येणार आहे. या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवरील वक्ते सहभागी होणार असून एकूण सहा सत्रांमध्ये मध्ये मार्गदर्शन करतील. या परिषदेसाठी विविध ३२ समित्या गठित करण्यात आल्याची माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश रामटेके यांनी दिली. दरम्यान कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात गुरुवारी आढावा घेऊन आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्यासंदर्भात सूचना दिल्या. यावेळी प्र- कुलगुरू एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, केसीआयआयएलचे संचालक राजेश जवळेकर, आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश रामटेके, सचिव डॉ. अजय सुरवाडे, समन्वयक डॉ.अजय पाटील, सहसमन्वयक डॉ. राम भावसार, प्रा . एस.आर.कोल्हे, डॉ.संदीप भामरे, प्रा. सुरेंद्र कापसे यांच्यासह विविध समित्यांचे सदस्य आणि संगणकशास्त्रे प्रशाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

जा.क्र. :- कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक : ०८ जानेवारी २०२६

प्रति,

मा. संपादक/ प्रतिनीधी

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
जनसंपर्क अधिकारी करीता